सत्यमेव जयते

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी- ०२०-२६३६०९४१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in


---

जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा- का.प.सू./का- ४/३६६४ दिनांक : १३/११/२०२४

# उमेदवारांसाठी महत्त्वाची सूचना

## वर्ष २०२४-२५ अंतर्गत पोलीस/सैन्य भरती या पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांनी विकल्प पोर्टलद्वारे निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेकडे मूळ कागदपत्रे पडताळणीबाबत...

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेमार्फत वर्ष २०२४-२५ मध्ये राबविल्या जाणाऱ्या "पोलीस/सैन्य भरती या पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम" (अनिवासी) योजनेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांना अनुसरून **उमेदवारांच्या इयत्ता दहावीच्या प्राप्त टक्केवारीनुसार व जिल्हा निहाय लाभार्थी लक्षांकानुसार (प्रति TSP जिल्हा - १००० लाभार्थी व प्रति Non-TSP जिल्हा - ३५० लाभार्थी याप्रमाणे व २०% प्रति जिल्हा अधिकचे उमेदवार यांना)** अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी दिनांक ०७ ते १७ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आलेल्या संस्था विकल्प सुविधा लिंक खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येत आहे. अशा उमेदवारांनी विकल्प पोर्टलद्वारे संस्था विकल्प प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संबंधित संस्थेमध्ये आपला प्रवेश निश्चित करण्याकरिता आपल्या मूळ कागदपत्रांची तपासणी करण्याबाबतच्या सूचना अलाहिदा देण्यात येतील.

- उमेदवारांनी मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यापूर्वी पडताळणीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रांची यादी वाचून घ्यावी.
- एकदा संबधित संस्था निवड केल्यावर खाली नमूद केलेल्या कागदपत्रांसोबतच संस्थेकडे पडताळणी करण्यासाठी संबंधित संस्थेकडून उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करण्याबाबतचा कालावधी कळविण्यात येईल.
- उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी देण्यात आलेल्या विहीत कालावधीतच आपले मूळ कागदपत्रे तपासून आपली प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून घ्यायची आहे.
- दिलेल्या विहीत कालावधीनंतर कोणत्याही उमेदवारास कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- संस्था प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रांची यादी –

  १. **अनुसूचित जमातीचे मूळ प्रमाणपत्र**
  २. **अनुसूचित जमातीचे मूळ वैधता प्रमाणपत्र**
  ३. दहावी गुणपत्रिका किंवा मूळ प्रमाणपत्र
  ४. वयाचा पुरावा दर्शविणारे कागदपत्रे यापैकी एक – पासपोर्ट, ड्रायविंग लायसन्स, पॅनकार्ड ई.
  ५. आधारकार्ड मूळ प्रत
  ६. डोमिसाईल मूळ प्रमाणपत्र
  ७. आधारकार्ड लिंक असलेले उमेदवाराचे बँक पासबुक

८. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मागील तीन वर्षाचा मूळ उत्पन्नाचा दाखला
९. अनाथ असल्यास, संबंधित उपयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा दाखला
१०. अद्ययावत फोटोग्राफ (Passport size photo) ०२ कॉपी

- प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत देय असलेले प्रशिक्षण शुल्क व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाबाबतची सविस्तर माहिती (Stipend and any other payments as applicable) ही यापूर्वीच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर दि.२०.०९.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२७५९ यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

(**डॉ. राजेंद्र भारुड**, भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे